# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./1151 /२०१८ दि. 17/4/२०१८

प्रति,

**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषय :- विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणेबाबत.**

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र.- युएनआय उशिसं / संकीर्ण /२०१८ / विशि - १/४२०५ दि. ०४/०४/२०१८

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते की, आपले महाविद्यालयामध्ये काम करणाऱ्या महिला, महाविद्यालयातील विद्यार्थ्यीनींच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे. संदर्भीय पत्रामध्ये नमुदनुसार आपल्या महाविद्यालयात महिलांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना तातडीने पुर्ण करुन घ्यावे व केलेल्या उपाययोजने संबंधी कार्यवाहीचा अहवाल उच्च शिक्षण, संचालनालय पूणे व या कार्यालयास सादर करावे.

संलग्न :- संदर्भीय पत्र

**(डॉ. ईश्वर मोहुर्ले)**
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. कुलसचिवांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**(डॉ. जी. डी. दुबे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 1430 दि. 10/4/18
जावक क्र. 2632 दि. 11/4/18

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 1619 दि. 11-4-18
जावक क्र. ......... दि. .........

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१

Web: www.dhepune.gov.in Mail Id: vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११११५३

क्र. -युएनआय उशिसं /संकीर्ण /२०१८ / विशि- १ | ४२०५ दिनांक- ४/४/२०१८

- 4 APR 2018

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,

**विषय** -विविध शासकीय कार्यालयात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना करणेबाबत.

**संदर्भ** - शासनाचे पत्र क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क्र.३३/१८/आस्था /दि.२६/३/२०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रासाबेत गृह विभागाचे पत्र दि -२२/२/२०१८ चे पत्र सोबत जोडलेले आहे. सदर शासन पत्रात कळविले आहे की, पोलिस आयुक्त बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यातबाबत शासनाने कळविले आहे

तरी दिनांक. २२/२/२०१८ च्या पत्रानव्ये आपण आपल्या स्तरावर आवश्यकती कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

( सुयश दुसाने )
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य पुणे- १

प्रत- मा.शा.भा.पारनाईक, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

DR (ESH)
11/4

श्री. कु. गायकवाड
परिपत्रक तयार करावे

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३/२०१८/आस्था-२
उच्च व तंत्र तंत्रशिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
४२९ (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय मुंबई-३२
दिनांक : २६ मार्च, २०१८

दू.क्र.०२२-२२८५५५६६

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१
28 MAR 2018
6409
आवक क्रमांक:- प्रति. प्रशा-२
शाखा:-

सहसचिव (विद्यापीठ शिक्षण / ग्रंथालये), उपसचिव (महाविद्यालयीन शिक्षण / आस्था / तंत्र शिक्षण / कला), उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजनांबाबत...

उपरोक्त विषयासंदर्भात पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत गृह विभागाचे दि.२२/२/२०१८ चे पत्र सहपत्रांसह सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,

सहपत्र : वरीलप्रमाणे

(श्री.भा.पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

श्रीम शिंदे

प्रत :
उपसचिव,गृह विभाग यांना त्यांचे पत्र क्र.संकीर्ण ०११८/प्र.क्र.१६/विशा-६, दि.२२/२/२०१८ च्या अनुषंगाने माहितीसाठी अग्रेषित.

परिपत्रक / मवि / विशा
३१३
श्रीम. कोळे यांना दिले.

प्रशा-२
२८/३

२१०८८२५.
१०१/३१८५१२
७/३/१८
१०७०
२८/०२/१८

९/८

**महाराष्ट्र शासन**

क्र संकीर्ण ०११८/प्र क्र १६ /विशा ६
गृह विभाग, मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२/०२/२०१८.
दु क्र ०२२-२२०२९४०७.
Email ID- home_special6@maharashtra.gov.in.

'28 FEB 2018

प्रति,

**अपर मुख्य सचिव**,उद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,परिवहन विभाग,मंत्रालय,मुंबई
**प्रधान सचिव**,कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई
पोलीस आयुक्त,मुंबई
**विशेष पोलीस महानिरीक्षक**, ना.ह. सं. व म. अ. प्र. वि.,
**पोलीस महासंचालक** कार्यालय,मुंबई.

**विषय :** शासनाचे विविध विभाग/कार्यालये, खाजगी आस्थापना/कार्यालये यामध्ये काम करणाऱ्या महिला तसेच सार्वजनिक सेवेचा वापर करणाऱ्या महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : या विभागाची समक्रमांक दिनांक १६/०२/२०१८ व दिनांक २१/०२/२०१८ ची पत्रे.

महोदय,

वरील विषयावरील पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांनी कळविलेल्या सुचनाच्या अनुषंगाने मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २१/२/२०१८ रोजी बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आपल्या विभागाशी संबधित महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना करणेबाबतच्या सूचना पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

आपल्या विभागाशी संबधित सुचना व्यतिरीक्त इतर सुचनांचा समावेश करावयाचा असल्यास त्याबाबत आपले स्तरावरून निर्णय घेऊन आपले अधिनस्त सर्व कार्यालये यांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात येऊन त्याची प्रत या विभागास पाठवावी हि विनंती.

आपला,
(व्यकंटेश भट)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण विभाग, उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण विभाग सचिव महाराष्ट्र राज्य, मुंबई व आयुक्त मुंबई महापालिका, मुंबई यांना शैक्षणिक परिसरात महिलांच्या छेडछाडीस प्रतिबंध करण्याबाबत सूचना**

१) मुंबईतील सर्व विद्यापीठे, महाविद्यालय, शाळा व इतर शैक्षणिक संस्था यामध्ये महिला छेडछाडीस प्रतिबंध होण्यासंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. ,

२) सर्व शैक्षणिक संस्थांच्या इमारतीचे, प्रवेशद्वार , बाहेरील/आतील परिसर व मैदानी परिसरात पुरेशा संख्येने सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याचे संस्थेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे.

३) शालेय विद्यार्थांच्या संरक्षण आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने शैक्षणिक संस्थेच्या इमारतीच्या भोवती सुरक्षित भिंतीचे कुंपन असावे. तसेच सुरक्षितेतेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात.

४) सर्व शैक्षणिक संस्थेच्या प्रवेशद्वारावर व इमारतीत दर्शनी ठिकाणी स्थानिक पोलीस ठाणेचे दूरध्वनी क्रमांक, पोलीस नियंत्रण कक्षाचे दूरध्वनी क्रमांक, महिला/बालक हेल्पलाईन क्रमांक, बालकांसाठी काम करणाऱ्या NGO चे संपर्क क्रमांक ठळकपणे दिसतील असे फलक लावण्यात यावेत.

५) सर्व विद्यार्थांना विशेषत: मुलींना स्वसंरक्षण कौशल्य आणि तंत्रज्ञानावरील प्रशिक्षण देण्याबाबत विचार करावा.

६) संस्थेच्या सर्व कर्मचारी वर्गाला वेळोवेळी महिला अत्याचारा संबंधित तसेच बालकांवरील अत्याचारा संबंधित कायद्यांची माहिती देऊन , त्यांच्या मध्ये संवेदनशीलता/जागरूकता निर्माण करावी.

७) शैक्षणिक संस्थाचालक व विश्वस्त हे विद्यार्थांच्या सुरक्षिततेसंदर्भात जागरूक असावेत.

८) शालेय कर्मचारी वर्गाने पोलीस व NGO मदतीने विद्यार्थांमध्ये लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच अशा घटना घडल्यास त्याची माहिती तात्काळ संबंधितांना कळविण्याबाबत माहिती देण्यात यावी.

९) शिक्षण संस्थेने विद्यार्थांच्या cyber stalking कडे लक्ष पुरवावे. तसेच त्यांना सायबर गुन्हया संदर्भात असलेल्या तरतूदीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृत करण्यात यावे.

१०) संस्थाचालक, विश्वस्त व शालेय कर्मचारी यांना बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१३ (पोक्सो) कायद्यातील तरतुदींची माहिती असावी.

११) सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्था यामध्ये "अंतर्गत तक्रार समिती" (Prevention of sexual harassment of women at workplace Act २०१३) स्थापन झाली आहे याची शहानिशा करून घ्यावी. जर समिती स्थापन झाली नसेल तर अशा समित्या तातडीने स्थापन करण्यास सर्वांना बाध्य करावे.